

रायगड जिल्हा

भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

# निधी मागणी-वितरण व्यवस्थेचा अभ्यास

## तर अंमलबजावणीच्या देखरेखीसाठी सोशल ऑडिट



अमृत आहार योजना आदिवासी विकास विभागाचा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून आदिवासी विभागाने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांना पाकीटबंद आहार (टीएचआर) बंद करून शिजवलेला ताजा चौरस आहार आठवड्यातून पाच दिवस देणे आणि सात महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार दिवस अंडी किंवा केळी देणे हे या योजनेचे खास वैशिष्ट्य आहे. त्यामुळे आदिवासी समाजातील स्त्रियांना व बालकांना या योजनेचा व्यवस्थित लाभ मिळावा व ही योजना अधिक चांगल्या पद्धतीने कार्यान्वित व्हावी म्हणून ग्रामसभा व विकेंद्रीकरणाच्या माध्यमांतून या योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करण्याचेही निर्देश या शासन निर्णयातून देण्यात आले आहे.

# भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची पार्श्वभूमी

अनुसूचित क्षेत्रातील आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त असून आदिवासी समाजामध्ये याचे प्रमाण ३३.१ टक्के एवढे आहे. आदिवासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजन वाढीचे प्रमाण कमी असल्यामुळे त्याचा परिणाम बाळाच्या वजनावर होऊन कमी वजनाची बालके जन्माला येतात. असे अनेक अभ्यास व संशोधनातून सिद्ध झाले आहे. तसेच बालक जन्मानंतर पहिले सहा महिने पूर्णपणे आईवर अवलंबून असल्यामुळे या कालावधीत मातेचे आरोग्य व पोषण चांगले राहणे आवश्यक असते. अपुरा आहार व गरोदरपणात घ्यावयाची काळजी याबाबत आदिवासी समाजामध्ये फारशी जागरूकता दिसून येत नाही. **या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना अतिरिक्त पूरक चौरस आहार देण्याबाबत मा. राज्यपाल यांच्या आदेशाने दिनांक १, डिसेंबर २०१५ पासून शासनातर्फे आदिवासी भागात १६ जिल्ह्यातील ८५ एकात्मिक बाल विकास प्रकल्पाअंतर्गत 'भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' राबवली जात आहे.**

तसेच अपुऱ्या उष्मांक व प्रथिनांमुळे आदिवासी भागातील बालकांच्या वाढीवर वाईट परिणाम होऊ नये, त्यांच्यामध्ये रक्तपांढरी, वाढ खुरटणे (स्टटिंग), उंचीच्या प्रमाणात कमी वजन (वेस्टींग), कमी वजन (अंडरवेट) असे प्रकार होऊन ही बालके कुपोषित होऊ नयेत. म्हणून **दिनांक ९, ऑगस्ट २०१६ या जागतिक आदिवासी दिनापासून आदिवासी भागातील ६ वर्षापर्यंतच्या बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी या योजनेचा दुसरा टप्पा राबविण्यात येत आहे.**

**भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना** आदिवासी विकास विभागाचा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून आदिवासी विभागाने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना पाकीटबंद आहार (टीएचआर) बंद करून शिजवलेला ताजा चौरस आहार आठवड्यातून पाच दिवस देणे, आणि ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडे किंवा केळी देणे हे या योजनेचे खास वैशिष्ट्य आहे. **त्यामुळे आदिवासी समाजातील स्त्रियांना व बालकांना या योजनेचा व्यवस्थित लाभ मिळावा व ही योजना अधिक चांगल्या पद्धतीने कार्यान्वित व्हावी म्हणून ग्रामसभा व विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून या योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करण्याचेही निर्देश या शासन निर्णयातून देण्यात आले आहे.**

अमृत आहार योजनेचे त्रयस्थ संस्थेमार्फत नियमितपणे मूल्यमापन करणे; **जिल्हा व राज्य स्तरावर आवश्यक तरतुदींचे नियोजन करणे**; स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सामजिक संस्था यांच्यामार्फत अमृत आहार योजनेवर देखरेख करण्यासाठी पुढाकार घेणे; एकात्मिक बाल विकास आयुक्त यांच्याकडून आलेल्या प्रस्तावित अंमलबजावणी कृती आराखड्यास व सुधारणेस मान्यता व मंजुरी देण्यासाठी **राज्यपातळीवर प्रधान सचिव, आदिवासी विकास मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सनियंत्रण समिती** स्थापन करण्यात आली आहे.

अंगणवाडी सेविकेमार्फत सर्वे केलेल्या आदिवासी भागातील सर्व गरोदर स्त्रिया व स्तनदा माता, ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची यादी एकत्रित करून फायनल करणे; जिल्हा स्तरावर आवश्यक तरतुदींबाबत आढावा घेऊन त्यानुसार जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तरतुदींचे नियोजन करणे; अंगणवाड्यांमधील आहाराची तपासणी करणे; **यासाठी जिल्हा पातळीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अंमलबजावणी समितीची रचना करण्यात आली आहे.** तर या योजनेची अंमलबजावणी योग्य रितीने होण्यासाठी अंगणवाडी पातळीवर अनुसूचित जमातीची महिला सरपंच वा ग्राम पंचायत सदस्य, गरोदर स्त्री, स्तन्यदा माता व अंगणवाडी सेविका यांच्या समावेशाने अमृत आहार समितीची रचना करण्यात आली आहे.



# असा झाला अमृत आहार योजनेचा अभ्यास...

अमृत आहार योजना आदिवासी विकास विभागाची असली तरी या योजनेची अंमलबजावणी एकात्मिक बाल विकास विभागामार्फत अंगणवाडीमधून केली जात आहे. योजनेत नमूद केल्याप्रमाणे या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होते का? अंमलबजावणी होत असताना येणाऱ्या अडचणी, त्या सुधारण्यासाठी स्थानिक ते राज्य स्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांच्या नेमक्या सूचना काय आहेत? राज्य ते अंगणवाडी पातळीवर या योजनेची निधी वितरणाची व मागणीची व्यवस्था काय आहे? हे जाणून घेण्याच्या दृष्टीने **'भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजने'**चे दस्तऐवजीकरण करण्याच्या उद्देशाने **रायगड,** ठाणे, आणि गडचिरोली या तीन जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर योजनेचा अभ्यास करण्याचे ठरले. रायगड जिल्ह्यात दिशा केंद्र या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने हा अभ्यास व सोशल ऑडिटची प्रक्रिया करण्यात आली.

## रायगड जिल्ह्यात या अभ्यासासाठी राज्य ते गाव पातळीवर खालील अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून माहिती घेण्यात आली

**राज्य**
- आयुक्त, महिला व बालकल्याण
- सहसचिव, आदिवासी विकास विभाग

**जिल्हा**
- उपजिल्हा कार्यकारी अधिकारी - महिला व बालकल्याण विभाग
- मुख्य प्रशासकीय आणि लेखा अधिकारी
- प्रकल्प अधिकारी - आदिवासी विकास विभाग

**तालुका**
- गट विकास अधिकारी
- प्रकल्प अधिकारी- एकात्मिक बाल विकास विभा
- वित्त अधिकारी-पंचायत समिती कार्यालय
- अंगणवाडी पर्यवेक्षिका

**गाव**
- अंगणवाडी सेविका
- अमृत आहार समितीचे सदस्य, सरपंच

**माहिती गोळा करण्याच्या पद्धती**
- सखोल मुलाखत
- निधी संदर्भातील दस्तऐवज (बिल्स, व्हाऊचर्स, रजिस्टर्स इ.)
- सर्व्हे फॉर्म

## अभ्यासातून निघालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे...

**एकूणच भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत येणाऱ्या निधीची मागणी व वितरण व्यवस्था आधी समजून घेण्यात आली.**



वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अमृत आहार योजनेतील निधीची मागणी प्रक्रिया अंगणवाडी स्तरावरून केली जाते. त्यानुसार तालुकास्तरावर बालविकास प्रकल्प अधिकारी आणि पर्यवेक्षिका, जिल्हास्तरावर अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) जिल्हा अधिकारी सोबत प्रकल्प अधिकारी (आ.वि.वि.) यांमार्फत मागणी प्रक्रिया पूर्ण होऊन प्रस्ताव राज्याला आदिवासी विकास विभागाकडे दिला जातो. वितरण प्रक्रिया मात्र आदिवासी विकास विभाग राज्य स्तरावरून जिल्ह्याला अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निधीचे वितरण होते. त्यानंतर तालुकास्तर बालविकास प्रकल्प अधिकारी (CDPO) मार्फत थेट आहार समिती/अंगणवाडीत निधी दिला जातो.

**अभ्यासादरम्यान, २०१६-१७ ते २०१८-१९ या आर्थिक वर्षांमध्ये राज्य ते आहार समितीस वितरित झालेल्या निधीचे खालील तपशील संबंधित यंत्रणांकडून घेण्यात आले.**

| क्र. | वर्ष | राज्य व जिल्हास्तर | जिल्हा ते तालुकास्तर | गाव/अंगणवाडी आहार समितीस्तर |
|---|---|---|---|---|
| १. | २०१६-१७ | नोव्हेंबर, मार्च | नोव्हेंबर, मार्च | एप्रिल, डिसेंबर |
| २. | २०१७-१८ | जून, नोव्हेंबर | डिसेंबर, मार्च | एप्रिल, मे, जानेवारी, मार्च |
| ३. | २०१८-१९ | ऑगस्ट, ऑक्टोबर, मार्च | ऑगस्ट, ऑक्टोबर, नोव्हेंबर, मार्च | मे, ऑक्टोबर, मार्च |



# विश्लेषण

**२०१६ - १७**

या आर्थिक वर्षात राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावरून प्रत्येकी दोनवेळा आहार समितीस निधी वर्ग करण्यात आला आहे. मात्र आहार समितीस मिळालेल्या दोन्ही निधी **वितरण कालावधीमध्ये** सात महिन्यांचा विलंब दिसतो.

**२०१७ - १८**

या आर्थिक वर्षात जून आणि नोव्हेंबर या महिन्यात निधी तालुका स्तरावर पाठवण्यात आला. गाव स्तरावर पाठवण्यात आलेला निधी एप्रिल, मे, जानेवारी आणि मार्च या महिन्यात वर्ग करण्यात आला. या निधी वितरण प्रक्रियेत जून ते डिसेंबर या काळात निधी दिला गेला नाही असे दिसून येते.

**२०१९ - २०**

या आर्थिक वर्षात ऑगस्टनंतर जिल्हास्तरावरून निधीचे वितरण झाले. या महिन्यात निधी तालुकास्तरावर पाठवण्यात आला. गावस्तरावर पाठवण्यात आलेला निधी सरासरी चार महिन्याच्या विलंबाने तीन वेळा दिला गेला. म्हणजे शेवटचा निधी मार्च २०१९ या महिन्यात मिळाल्याचे निदर्शनास आले.

वरील तिन्ही वर्षांमध्ये अमृत आहार योजनेच्या शासन निर्णयाप्रमाणे कोणत्याच वर्षी आहार समितीस आगाऊ (Advance) निधी दिलेला नाही.



## वर्ष २०१८-१९




वर्ष २०१८-१९ - या आर्थिक वर्षात राज्याकडून जुलै, ऑक्टोबर आणि मार्च या तीन टप्प्यात जिल्ह्याला निधी मिळाला आहे. या आर्थिक वर्षात निधी ५० लाखांनी कमी झालेला दिसतो. जिल्ह्यावरून तालुका स्तरावर BDS प्रणालीमार्फत निधी त्याच तारखांना देण्यात आल्याचे दिसून येते. तालुका स्तरावर आधीच्या वर्षातील निधी शिल्लक असल्याने एप्रिल, जुलै, ऑक्टोबर आणि जानेवारी या महिन्यांमध्ये निधी वर्ग करण्यात आला.

# अमृत आहार योजनेच्या अभ्यासातून पुढे आलेल्या शिफारशी-

रायगड जिल्ह्यात अमृत आहार योजनेच्या निधी वितरण आणि योजनेच्या सनियंत्रण आणि अंमलबजावणीबाबत जिल्हा ते गाव स्तरावरील शासकीय यंत्रणेकडून पुढील माहिती घेण्यात आली. निधी संबंधित काय अडचणी आहेत? योजनेची देखरेख यंत्रणा कशी आहे? योजनेच्या अंमलबजावणीत काय अडचणी येतात? योजनेच्या अंमलबजावणीबाबत आपल्या काय सूचना आहेत? याबाबत माहिती घेतली असता या माहितीच्या आधारे पुढीलप्रमाणे स्तरनिहाय शिफारशी समोर आल्या.

## गावस्तर / अंगणवाडी

| निधी मागणी व वितरणासंबंधित अडचणी | देखरेख व सनियंत्रण यंत्रणा | अंमलबजावणीतील अडचणी |
|---|---|---|
| ▪ **अंगणवाडी पातळीवर अमृत आहारासाठी आलेल्या निधीच्या खर्चाचे** तपशील, मागणीपत्र, खर्चाचे व्हाउचर्स, निधी खर्चाबाबत आहार समितीचे निर्णय आदींचे **रेकॉर्ड व्यवस्थित ठेवले नसल्याचे सर्व अंगणवाडीत दिसून आले.**<br>▪ अंगणवाडी सेविकांना आहाराचे **आगावू पैसे मिळत नसल्यामुळे** बऱ्याच वेळा **पदरचे पैसे खर्च करावे लागले** असल्याचे दिसून आले.<br>▪ **अंगणवाडी सेविकांचे हिशोब कसे ठेवायचे** याबाबत **पूर्णपणे प्रशिक्षण झाले नसल्यामुळे** खर्चाच्या **नोंदी व्यवस्थित ठेवल्या नाहीत.**<br>▪ **योग्य प्रमाणात व वेळेवर पुरेसा निधी मिळत नसल्यामुळे** अंगणवाडी सेविकांना योजना राबवत असतांना अडचणी आल्या असल्याचे दिसून आले.<br>▪ अमृत आहार समितीच्या नावे निधी येत असला व समितीच्या मान्यतेने निधी खर्च करायचा असा नियम असला तरी या **समित्यांना याबद्दल कोणतीच कल्पना नसल्याचे व या समित्यांचे याबाबत तसे प्रशिक्षणही झाले नसल्याचे दिसून आले.**<br>▪ अमृत आहार समितीला निधी कधी वितरीत झाला याबाबत अंगणवाडी सेविकांना तालुका स्तरावरून कळविण्यात येत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे **आहार** | ▪ अमृत आहार योजनेच्या शासकीय परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे अंगणवाडी पातळींवर ही योजना व्यवस्थित चालण्यासाठी व तिच्यावर देखरेखीच्या हेतूने **अमृत आहार समिती गठीत होणे आवश्यक आहे. मात्र या सर्व गावात ही समिती गठीत झाल्याचे रेकॉर्डस् उपलब्ध झाले नाहीत.**<br>▪ **पर्यवेक्षिका आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी (सीडीपीओ)** यांनी महिन्यातून किमान २० अंगणवाडींना भेट देऊन अमृत आहार योजनेचा आढावा घेणे व अमृत आहाराची गुणवत्ता तपासणे आदी गोष्टी करणे अपेक्षित आहेत. मात्र ते प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात न जाता त्यांच्या मासिक बैठकीमध्येच अमृत आहार योजनेचा आढावा घेत असल्याचे आढळून आले. त्यामुळे गाव पातळीवर ही योजना राबवत असताना नक्की कोणत्या अडचणी येतात. हे कळत नाही.<br>▪ अमृत आहार योजनेचे हिशोब आहार समितीने ग्रामसभेत मांडणे आवश्यक आहे. **मात्र आहार समितीला व ग्रामसभेला** | ▪ **अमृत आहार योजनेचा शिधा, गॅस सिलेंडर** बाजाराच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणाहून आणावे लागते. **ते आणण्यासाठी निधीची तरतूद केली नसल्याने हा खर्च स्वतःच्या खिशातूनच करावा लागत असल्याचे** अंगणवाडी सेविकांनी सांगितले.<br>▪ अंगणवाडी सेविका व सरपंच यांच्या सहीने निधी काढावा लागत असल्याने **सरपंचाना बँकेत घेऊन जाणे येण्याचा खर्च अंगणवाडी सेविकेला करावा लागतो.** त्याचीही तरतूद केलेली नसल्याचे लक्षात आले.<br>▪ **आहार बनवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची कमतरता** असल्याचे अंगणवाडी सेविकांनी सांगितले. |

| निधी मागणी व वितरणासंबंधित अडचणी | देखरेख व सनियंत्रण यंत्रणा | अंमलबजावणीतील अडचणी |
|---|---|---|
| **समितीच्या खात्यावर निधी जमा झाला असला तरी अंगणवाडी सेविकांना ते कळत नाही.**<br>▪ गेल्या मार्च २०१९ नंतर अमृत आहार योजनेचा निधी आला नसल्यामुळे जानेवारी २०२० पर्यंत म्हणजे **११ महिने अमृत आहार योजना राबवली नाही.** | **याबाबत त्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या माहित नसल्याचे आढळून आले.** | ▪ अमृत आहार योजनेच्या **लाभार्थ्यांमध्ये या योजनेबद्दल जागरूकता आढळून आली नाही.** |

## गाव पातळीवरून आलेल्या सूचना

- तालुक्यातील **सर्व अंगणवाडी सेविकांचे पद तातडीने भरण्यात यावे,** आणि त्वरित आहार समितीचे प्रशिक्षण आणि समितीची जबाबदारी निश्चित करण्यावर भर द्यावा.
- **प्रती लाभार्थी ३५ रुपयात आहार देणे परवडत नसल्याने निधीच्या रकमेत वाढ करण्यात यावी.**
- राज्य पातळीवरून जिल्हा पातळीवर **१०० टक्के निधी** आर्थिक वर्षात **सुरुवातीलाच वितरित केला तर निधी वितरणातील विलंब व योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी कमी होतील.**
- **उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून नियमितपणे दर तीन महिन्याला अमृत आहार समितींना निधी वितरित** झाला तर गाव पातळीवर योजना सुरळीत चालण्यास मदत होईल.
- योजनेच्या अंमलबजावणीसाठी व निधीचा हिशोब चोख ठेवण्यासाठी **अंगणवाडी सेविकांचे नियमितपणे प्रशिक्षण करत राहणे** आवश्यक आहे.
- **अंगणवाडी पर्यवेक्षकांनी** तालुका पातळीवर आढावा न घेता त्या सोबत **प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात जाऊन या योजनेची देखरेख करणे आढावा घेणे आवश्यक आहे.**
- अमृत आहार समितीमार्फत गाव पातळीवर या योजनेची देखरेख न करता **गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व पोषण समितीमार्फत या योजनेची देखरेख केल्यास योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होईल.** यामुळे या समितीच्या मदतीने गाव पातळीवर ग्रामसभेमार्फत येणाऱ्या त्रुटी व अडथळे दूर करण्यास मदत होईल.



## तालुकास्तर

| निधी मागणी व वितरणासंबंधित अडचणी | देखरेख व सनियंत्रण यंत्रणा | अंमलबजावणीतील अडचणी |
|---|---|---|
| ▪ तालुका पातळीवरील **अधिकारी-कर्मचारी यांच्या म्हणण्यानुसार गाव/अंगणवाडी कडून निधीची मागणी वेळेत येत नाही.**<br>▪ **तालुक्यातील सर्व अंगणवाडीतील मागणी आल्याशिवाय एकत्रित मागणी पत्र तयार करून जिल्ह्याला पाठवता येत नाही.**<br>▪ वरूनच **निधी हप्त्या-हप्त्याने मिळाल्यामुळे नेहमी मागील बाकीवरच आलेला पैसा खर्च होतो.** असे आहार समित्यांचे/सेविकांचे म्हणणे आहे. | ▪ **योजनेची अमलबजावणी योग्य रितीने चालू आहे की नाही? या संदर्भात फिल्डमध्ये जाऊन तपासणी करणे,** सूचना देणे, मार्गदर्शन करणे या प्रकारची सर्व कामे पर्यवेक्षिका करत असतात.<br>▪ शासकीय परिपत्रकानुसार **आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी यांच्या स्तरावरील रिक्त पदांमुळे अंगणवाडीला भेटी होत नाहीत.**<br>▪ तालुका पातळीवर **अंगणवाडी सेविकांच्या मासिक बैठकांमध्ये या योजनेचा आढावा व मागणी पत्र घेतले जाते.** | ▪ तालुका पातळीवर **एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग या दोन विभागांमध्ये समन्वयाचा अभाव दिसून आला.**<br>▪ तालुका पातळीवर देखील योजनेचा **निधी आगाऊ दिला जात नाही.** म्हणून देखील योजनेच्या अंमलबजावणीत अडचणी येतात. |

## अमृत आहार योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणीसाठी तालुका पातळीवरून आलेल्या सूचना

- **सीडीपीओ यांच्या पातळीवर पुरेसा शिल्लक निधी उपलब्ध राहील्यास ज्या आहार समितीला निधीची आवश्यकता आहे त्यांना लगेच सदर निधी वर्ग करता येईल.** जेणे करून गाव पातळीवर योजना नियमित स्वरुपात चालू राहील.
- **अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका** यांचे योजनेच्या अंमलबजावणीबाबत, जमाखर्चाच्या नोंदीचे दस्तऐवज हाताळणीबाबत **नियमित प्रशिक्षण करण्यात यावे.**
- **तालुका पातळीवर एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग या दोन विभागांमध्ये समन्वयासाठी** नियमित बैठका व दोघांच्या मिळून कार्यक्षेत्रात भेटी होणे आवश्यक आहे. त्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत.



## जिल्हास्तर

| निधी मागणी व वितरणासंबंधित अडचणी | देखरेख व सनियंत्रण यंत्रणा | अंमलबजावणीतील अडचणी |
|---|---|---|
| ▪ आर्थिक वर्ष २०१९-२० या काळात जिल्हा नियोजन व विकास समिती निधीमधून जिल्हा अधिकारी यांच्या परवानगीने निधी वितरीत करण्यात आला.<br>▪ **तालुका पातळीवरून निधीचे मागणी पत्र मिळाले नाही.** | ▪ **उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सध्या शिक्षण आणि पोषण या दोन्ही सेवांचा चार्ज असल्यामुळे अमृत आहार योजनेस पुरेसा वेळ दिला जात नाही.**<br>▪ **आदिवासी विकास विभाग कार्यालयात पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे** गेल्या दोन वर्षात अमृत आहार योजनेचा आढावा घेण्यासाठी एकदाही कार्यक्षेत्र भेट झाली नाही.<br>▪ **तालुका व जिल्हा पातळीवरून सनियंत्रण समित्यांकडून नियमित AAY निधी वितरण प्रक्रियेचा आढावा घेतला गेला नाही.** | ▪ **बीडीओ आणि सीडीपीओ यांच्या उपस्थितीत AAY - निधी मागणी-वितरणाबाबत** आढावा घेण्यासाठी नियमित बैठका घेतल्या नाहीत.<br>▪ **गाव पातळीवरून निधी मागणीचे पत्र तालुका पातळीवरून मिळाले नाही** म्हणून तालुका पातळीवरून जिल्ह्याला पाठवले नाही अशा स्वरूपाच्या अडचणी संबंधित अधिकारी-कर्मचारी पातळीवर दिसून आल्यात. |

## अमृत आहार योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणीसाठी जिल्हा पातळीवरून आलेल्या सूचना

- **गाभासमिती व नवसंजीवनी समितीच्या बैठकीतच अमृत आहार योजनेचा आढावा न घेता जिल्हा सनियंत्रण व अंमलबजावणी समितीच्या नियमित व विशेष बैठका घेऊनच** AAY - योजनेचा आढावा घेण्यात यावा.
- योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी **निधीच्या मागणी व वितरणासाठी कायमस्वरूपी संगणकीय यंत्रणा विकसित** करण्यात यावी.
- जिल्ह्याच्या **आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांना योजनेच्या सनियंत्रण व अंमलबजावणीबद्दल पुरेशी स्पष्टता देणे** आवश्यक आहे.
- निधी वितरणातील विलंब टाळण्यासाठी गडचिरोलीची निधी वितरणाची यशस्वी व्यवस्था रायगडमध्ये देखील ताबडतोब राबवावी. ज्यामध्ये **उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून थेट आहार समितीच्या खात्यावर निधी वर्ग करण्यात यावा.**
- **या योजनेच्या अंमलबजावणीत ग्रामसभांचा सहभाग वाढविण्यासाठी जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढाकार घ्यावा.**

या शिफारशींची जिल्हा यंत्रणेने दखल घेऊन त्यानुसार अंमलबजावणी केल्यास निश्चितच अमृत आहार योजनेचा हेतू सफल होण्यास अधिक मदत होईल.



# 'भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजने'चे सोशल ऑडिट

अमृत आहार योजना राबवत असताना ग्रामसभा व विकेंद्रीकरणाच्या माध्यमांतून या योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करण्याच्या निर्देश या योजनेच्या शासन निर्णयात देण्यात आला आहे. या निर्देशाचा आधार घेत गाव पातळीवर या योजनेची सद्यस्थिती काय आहे? योजनेत ठरवल्याप्रमाणे आहार दिला जातो का? निधी वेळेवर मिळतो का? योजना राबवताना अंगणवाडी सेविकांना काय अडचणी येतात? प्रत्यक्ष लाभार्थ्याला या योजनेचा लाभ कसा मिळतो? हे तपासण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील रायगड, ठाणे आणि गडचिरोली या तीनही जिल्ह्यातील अनुक्रमे कर्जत, मुरबाड आणि कोरची या तीन तालुक्यातील प्रत्येकी ३ गावांमध्ये सामाजिक अंकेक्षण करण्यात आले.

## रायगड जिल्ह्याविषयी थोडक्यात

'रायगड' आदिवासी (अनुसूचित जमाती) जमातींपैकी सर्वाधिक लोकसंख्या (२,६३४,२००) असलेला महाराष्ट्राच्या कोकण भागातील जिल्हा आहे. शिवाय आर्थिकदृष्ट्या वंचित आणि एकाच हंगामात शेती करू शकणारा समाज जास्त आहे. इतर हंगामात वीटभट्ट्या आणि रोजंदारीवर काम करणे याच प्रकारची कामे जास्त होतात. जिल्ह्यात कर्जत तालुक्यात दोन प्रकल्प मिळून २७८ मुख्य अंगणवाडी आणि ५८ मिनी अंगणवाडी आहेत. (मे-२०१९)

एनएफएचएस-४ च्या आकडेवारीनुसार, रायगडमध्ये ५०.८ टक्के १५-४९ वर्षे वयोगटातील गरोदर महिला ॲनेमिक (अशक्त) होत्या; ६.६ टक्के मुले कमी वजनाची आणि ८.५ टक्के मुले तीव्र कमी वजनाची होती. कदाचित याच पाश्वभूमीवर अमृत आहार योजना सुरुवात म्हणून 'कर्जत' या एका तालुक्यात राबविली जात होती. त्यानंतर शासनाच्या नवीन नियमांनुसार अमृत आहार योजनेत तालुक्यांची संख्या वाढविली. ज्यामध्ये कर्जत सोबत, खालापूर, पेण, पनवेल, रोहा व सुधागड हे तालुकेही सामील केले गेले.

## सामाजिक अंकेक्षणाची पूर्वतयारी

सामाजिक अंकेक्षणासाठी कर्जत तालुक्यात गावंडवाडी, पेटारवाडी, रामाचीवाडी, अंतराटवारेदी, बाणगरवाडी, काठेवाडी या सहा गावांची निवड केली गेली. तशी गाव पाडे स्वरुपात असून छोटी आहेत. स्थानिक संस्थेमार्फत केलेल्या पाहणीत आणि प्राथमिक माहितीनुसार या गावांमध्ये अंगणवाडी सेविकांचे अपुरे मनुष्यबळ, अंगणवाडीत आवश्यक संसाधनांची कमतरता, अंगणवाडी व शाळेतील मुलांना पोषण आहार दिला जात नाही. इत्यादी अडचणी निदर्शनास आल्या.

त्यानंतर वर नमूद केलेल्या गावामंध्ये गावसभा/गाव



बैठक घेत भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेविषयी जाणीव जागृती व सामाजिक अंकेक्षण (सोशल ऑडिट)चे महत्त्व गावकऱ्यांना पटवून देण्यात आले. गावातील प्रमुख व आहार समितीच्या सदस्यांच्या सहभागाने सामाजिक अंकेक्षण गट बनवण्यात आले. गटबांधणीचा मुख्य उद्देश होता की, अमृत आहार योजनेचे सामाजिक अंकेक्षण करणे आणि अंगणवाडीतील सेवांची माहिती तालुका-जिल्हा यंत्रणेला पोहचवणे. अर्थात ही सर्व प्रक्रिया घडवून आणण्यासाठी दिशा सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत सामाजिक अंकेक्षण गटाचे मार्गदर्शक म्हणून भूमिका पार पाडली.

## सोशल ऑडिट प्रक्रिया करण्यासाठी गटाचे प्रशिक्षण

**या सहा गावातील गटांना व अमृत आहार योजनेतील लाभार्थी महिलांना एकत्र करून अमृत आहार योजनेचे सामाजिक अंकेक्षण कसे व का करायचे? याबबत दोन दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात पुढील गोष्टींवर भर देण्यात आला.-**

- अमृत आहार योजना नक्की काय आहे? योजनेचा हेतू काय आहे? या योजनेचे लाभार्थी कोण आहेत? या योजनेत काय तरतुदी आहेत? योजनेची अंमलबजावणी करण्यासाठीची जबाबदार यंत्रणा काय आहे?
- अमृत आहार योजनेच्या शासकीय माहितीचे संकलन कसे व कोणाकडून करायचे? योजनेची जाणीवजागृती कशी करायची?
- शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून गावगटाला जी माहिती घ्यायची आहे, त्या माहितीचे स्वरूप कोणत्या प्रकारचे असेल? त्याचे फॉरमॅट समजून सांगणे.
- मिळालेल्या माहितीची पडताळणी कोणी व कशी करायची? पडताळणीचा हेतू काय?
- पडताळणीतून पुढे आलेल्या मुद्द्यांच्या निराकरणासाठी जनसंवादाचे आयोजन आणि पाठपुरावा कसा करायचा?
- निवडलेल्या गावांमध्ये प्रत्यक्ष सोशल ऑडिट घडवून आणण्यासाठीचे नियोजन करणे.

## असे केले अमृत आहार योजनेच्या माहितीचे संकलन व जाणीवजागृती

- गावातील लोकांना त्यांच्या भाषेत व सोप्या पद्धतीने अमृत आहार योजनेची माहिती कळावी. यासाठी प्रशिक्षणात माहितीवर जास्त भर देण्यात आला होता. त्यामुळे कार्यकर्ते आणि गटातील लोकांनी गावात बैठकी, गावसभेत, लाभार्थी महिलांसोबत संवाद इत्यादी मार्फत लोकांमध्ये जाणीवजागृती केली.
- अमृत आहार योजनेची तपशीलवार माहिती घेण्यासाठी फॉरमॅट तयार करून गावगटांना देण्यात आले. या फॉरमॅटच्या आधारे अंगणवाडी सेविकांकडून माहिती संकलित करण्यात आली. सेविकांनी माहिती तर दिलीच शिवाय माहिती घेते वेळी त्यांना निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी दुरुस्त करण्याची जबाबदारीही त्यांनी घेतली.



- अमृत आहार योजनेचे लाभार्थ्यांचे रजिस्टर, जमा खर्चाच्या नोंदी, बँकेचे पासबुक, मागणी पत्र, लाभार्थी हजेरी पट, अमृत आहार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, आहार रजिस्टर व लाभार्थ्यांची यादी यापैकी ज्या गोष्टी अंगणवाडीत आहेत/होत्या त्यांची माहिती नोंदवण्यात आली.

## माहितीची पडताळणी

- सामाजिक अंकेक्षणाचा पुढचा आणि महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे मिळालेल्या माहितीची पडताळणी करणे. ही पडताळणी निरपेक्षपणे व्हावी असे अंकेक्षण करतेवेळी अपेक्षित असते.
- कर्जतमधील गावांमध्ये एप्रिल ते डिसेंबर २०१९ या कालावधीतील अंगणवाडीमधील अमृत आहार समितीच्या बैठकीचा अहवाल, अमृत आहार समिती तपासणी नोंदवहीतील टिपण इत्यादी बाबीचे रेकॉर्ड आहे की नाही यांचीही पडताळणी माहिती गोळा करण्याच्या प्रक्रियेत झाली होती.
- लाभार्थ्यांच्या यादीप्रमाणे गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांच्या (लाभार्थ्यांच्या) घरी जाऊन, अंगणवाडी सेविकांनी सांगितलेली माहिती गाव गटाने पडताळून पाहिली.
- अमृत आहाराची गुणवत्ता कशी असते? आहाराचा दर्जा कसा असतो? शासकीय परिपत्रकात ठरवून दिल्यानुसार आहार नियमित स्वरूपात मिळतो का? (हिरवी भाजी, पोळी/ भाकरी, डाळ-भात, अंडे किंवा केळी, शेंगदाणा लाडू, लिंबाची फोड), आहाराविषयी काही तक्रारी आहेत का? अंगणवाडी सेविकांना आहार देताना काय अडचणी येतात? अंगणवाडीला येणाऱ्या अडचणी / निधीबद्दल गावात किंवा ग्रामसभेत चर्चा केली जाते का? अमृत आहार योजनेअंतर्गत अंगणवाडीमध्ये आहार समितीच्या बैठका नियमित होतात का? आदी माहितीची पडताळणी गरोदर स्त्री व स्तन्यदा मातांशी बोलून करण्यात आली.
- पडताळणीच्या शेवटी अंगणवाडीतून मिळालेली अमृत आहार योजनेची शासकीय माहिती, पडताळणीतून दिसून आलेल्या तफावती, लाभार्थींनी सांगितलेल्या अडचणी, अंगणवाडी सेविकांनी मांडलेल्या अडचणी, नव्याने समोर आलेले मुद्दे यांची नोंद संस्था आणि गाव गटातील प्रतिनिधी यांनी घेतली.
- त्या दरम्यान, अंगणवाडीत लाभार्थी यादी सोडून बऱ्याच गोष्टी अपूर्ण स्वरूपाच्या होत्या. त्यामुळे मिळालेला आहार आणि वाटप झालेला आहार याचा ताळमेळ जुळवणे आणि पडताळणी करणे शक्य झाले नाही.

## गाव जनसुनवाई

- अमृत आहार योजनेच्या माहितीची प्रत्यक्ष लाभार्थ्यांना भेटून पडताळणी झाल्यावर पडताळणीतून पुढे आलले मुद्दे सोडविण्यासाठी या सहा गावांमध्ये जनसंवादाचे नियोजन केले.
- या जनसंवादात संबंधित सरकारी अधिकारी उपस्थित राहतील यासाठी संस्थेच्या वतीने पाठपुरावा करण्यात आला. प्रत्यक्ष जनसंवादाच्या वेळी सादर करायची माहिती व अहवाल तयार करण्यात आले.
- अमृत आहार योजनेची माहिती देऊन पडताळणीअंती उपस्थित झालेले मुद्दे या जनसंवादात चर्चिले गेले. जे मुद्दे गाव पातळीवर सुटणारे होते त्यावर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. तर धोरणात्मक निर्णयांसाठी तालुका व जिल्हा पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली.



## कर्जत तालुक्यात सोशल ऑडिट दरम्यान झालेल्या पडताळणीतून पुढे आलेल्या समस्या आणि मुद्दे

- बांगरवाडी गावात काही महिलांची गरोदरपणाची नोंद झाली, मात्र एक महिन्यानंतर निधी अभावी योजना बंद झाली.
- ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील मुले अंगणवाडीत जातात मात्र अंडी किंवा केळी मिळतच नाही.
- कर्जत तालुक्यातील ज्या ८ अंगणवाडीच्या कार्यक्षेत्रात सोशल ऑडिट करण्यात आले. त्या सर्व पाड्यांमध्ये/गावांमध्ये आहार समितीचे गठन करण्यावर अजिबातच तालुका पातळीवरून भर देण्यात आला नाही.
- बांगरवाडी, पेटारवाडी अशा ४-५ अंगणवाडीत अमृत आहार समिती गठीत झाली असल्याचा ठराव उपलब्ध नसून समितीचे रजिस्टर, आहार तपासणी रजिस्टर व चव रजिस्टर उपलब्ध नाही. आहार समिती सक्रीय नसल्यामुळे समितीच्या बैठका होत नाहीत. अमृत आहाराबद्दलच्या नोंदी होत व्यास्थित होत नसल्याचे आढळून आले.
- पेटारवाडीत अंगणवाडीची स्वतंत्र इमारत नसल्यामुळे सेविकांच्या घरात मुलांना बसवले जाते. याबाबत आतापर्यंत सर्वच स्तरावर पाठपुरावा झाला असून अजून तरी योग्य तो पर्याय समोर आलेला नव्हता.
- सर्वच गावामध्ये जानेवारी २०२० पासून अमृत आहार देण्याचे बंद आहे. कारण प्रत्येक अंगणवाडी सेविकेचे मागील बिल कमीत कमी ३० ते ६० हजार आणि जास्तीत जास्त ९० हजार एवढे पैसे शासनाकडे बाकी आहेत.
- सर्वच गावांत अमृत आहार समितीबद्दल फारशी माहिती नसल्यामुळे ग्रामसभेत या समिती बद्दल कधी चर्चा झाली नाही. आहार समितीचे हिशोब तपासले गेले नाहीत.
- गावातील अंगणवाडीत आहार रजिस्टर्स नसल्यामुळे लाभार्थ्यांच्या सह्या घेतल्या जात नाहीत. तर गावातील इतर पाड्यातील काही गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता आहार घेण्यासाठी अंगणवाडीत नियमित येत नाहीत.



# कर्जत तालुक्यात सोशल ऑडिट व AAY अभ्यासादरम्यान पुढे आलेले सकारात्मक बदल

१

रामाचीवाडी येथील अंगणवाडी ३ वर्षांपासून बंद होती परिणामी अमृत आहार योजना बंद होती. लोकसहभागी ऑडिट प्रक्रिया दरम्यान समिती सदस्यांना सदर योजनेविषयी सखोल माहिती दिल्यावर, स्थानिक लोकांनी मंडळ अधिकारी (महसूल विभाग) यांच्याकडे अंगणवाडी सुरू करण्याची मागणी केली. सोबत गाव गट आणि संस्था यांनी तालुका पातळीवरील संबंधित सर्वच अधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यानंतर फेब्रुवारीमध्ये अंगणवाडी सुरू करून व आहार द्यायला सुरुवात झाली आहे.

२

रायगड जिल्ह्यात चालू असलेल्या अमृत आहार योजनेस एकूण ८६.९० (रु.लाखात) निधी जिल्हा अधिकारी (जिल्हा नियोजन समिती सदस्य) रायगड (अलिबाग) यांनी आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या मागणीप्रमाणे २३ मार्च २०२० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासकीय मान्यता देवून वितरीत करण्यास मंजुरी दिली. (मुलाखतीं दरम्यान ३१ जानेवारी २०२०, मुख्य कार्यकारी अधिकारी याना सदर गंभीर परिस्थितीची माहिती आणि पत्रव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर आणि स्थानिक संस्थेच्या सततच्या पाठपुराव्यानंतर)



ज्या-ज्या गावांमध्ये अंगणवाडी सेविकांचा रिक्त पदांचा मुद्दा होता त्या गावांची माहिती गावगट आणि समितीच्या आधारे संस्थेमार्फत संबधित जिल्हा आणि तालुका प्रशासनाला लेखी निवेदन देण्यात आले. परिणामी फेब्रुवारी महिन्यात अंगणवाडी सेविकांची भारती प्रक्रिया सुरू करून लोकसहभागी ऑडिट प्रक्रियेतील गावांना प्राधान्य देण्यात आले..

3

साथी
Support for Advocacy & Training to Health Initiatives

- प्रकाशक : साथी
  फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस सोसायटी,
  डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८
- फोन : ०२०-२५४७२३२५/२५४७३५६५
- ई-मेल : sathicehat@gmail.com
- वेबसाईट : www.sathicehat.org
- प्रकाशन : जून २०२०